# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 22/10/2023 (रविवार) सकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील विर सावरकर कॉलनी फेज —०२ येथे फिर्यादी नामे— गोवर्धन खुशाल हटवार, वय ४२ वर्ष रा. विर सावरकर फेज २ ता. हिंगणा जि. नागपुर हे आपले कुटुंबियांसोबत मुळ गावी भिवापुर येथे गेले असता त्याचे शेजारी राहणा—या शालीनी नवघरे यांनी फिर्यादीचे पत्नीला फोन करून सांगितले की, तुमचे घराचे दरवाज्याचे कुलुप तुटलेले आहे. यावरून फिर्यादी हे विर सावरकर कॉलनी बोरी येथे आले असता घराचे कुलुप तुटलेले होते व घरातील एकुण नगदी ७०००/—रू व ०१ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी किंमती ३०००/—रू चा असा एकुण १०,०००/— रू. चा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरविंद चव्हान हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत मौजा वार्ड क्र. 06 क्वॉर्टर नं. 44/23 चनकापुर कॉलनी येथे फिर्यादी नामे— शैलेश विनोद गौतम, वय 39 वर्ष, रा. वार्ड क्र. 06 क्वॉर्टर नं. 44/23 चनकापुर कॉलनी, ता. सावनेर हा दि. 20/10/2023 चे 19/00 वा. त्याचे परिवारासह वस्तीत असलेल्या देवीचे मंडळात असलेल्या जागरणाचे कार्यक्रमा करिता राहते घराचे दार टेकवून कार्यक्रमात गेले असता व तो 21/45 वा. घरी परत आले असता त्यांना त्यांच्या बेडरूम मध्ये असलेल्या अलमारीचे दार उघडे दिसले व बेडवर सामान अस्तव्यस्त पडून दिसल्याने व अलमारीचे लॉक खुले दिसून आल्याने त्यांनी अलमारीची पाहणी केली असता त्यात ठेवून असलेली लाल रंगाची पर्स ज्यामध्ये त्यांचे लग्नाचे आंदणमध्ये मिळालेले सोन्या चांदीचे दागिने 1) बिंदिया 2 ग्रॅम किंमती 2,000/—रु, 2) नथ मारवाडी 2 ग्रॅम किंमती 2,000/—रु, 3) कानातील झुमके 3 ग्रॅम किंमती 6,000/—रु, 4) मंगळसूत्र 5 ग्रॅम किंमती 10,000/—रु, 5) कानातील बाली 2 ग्रॅम किंमती 2,000/—रु, 6) नाकातील खडा 2 ग्रॅम किंमती 2,000/—रु, असा एकुण किंमती 24,000/—रु, चांदीची पायल 10 तोळे, मेहंदी अंदाजे 10 तोळे, कमरपट्टा अंदाजे 10 तोळे असा किमती 8,000/—रु. व नगदी 2,000/—रु असा एकूण 34,000/—रु. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरानी चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. प्रफुल राठोड हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**